यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक – ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत

ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : •www.ycmou.ac.in •https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : dir_shu@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231475

मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा / School of Humanities & Social Sciences

जा.क्र. : यचममुवि/मानव्य/२०२४/ दिनांक : १६/१०/२०२४

# वाचन प्रेरणा दिन-अहवाल



मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे दि.१५ऑक्टोबर २०२४ रोजी डॉ. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त 'वाचन प्रेरणा दिना'चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे श्री. सुशील म्हसदे तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेचे संचालक प्रा. नागार्जुन वाडेकर होते. याप्रसंगी शैक्षणिक समन्वयक डॉ. बाळासाहेब दिघे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय यांनी करून दिला. श्री. सुशील म्हसदे यांनी 'वाचन आणि लेखन प्रेरणा आणि स्वरूप' या विषयावर उपस्थितांना व्याख्यान दिले.

श्री. म्हसदे यांनी व्याख्यानातून ग्रंथ म्हणजे काय हे सांगितले. तसेच ग्रंथाचे प्रकार, ग्रंथ प्रकाशनाची कार्यपद्धती सविस्तर स्पष्ट केली. ग्रंथ वाचन करून ग्रंथ परीक्षण कसे करावे याबाबत उपयुक्त मार्गदर्शन केले. त्याचबरोबर अखंड वाचनाचे महत्व पटवून देऊन उपस्थितांना लेखनकार्य करण्यास प्रेरित केले.

विद्याशाखेचे संचालक प्रा.नागार्जुन वाडेकर यांनी लेखक व वाचकाची भूमिका याविषयी भाष्य केले. उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांस श्री. म्हसदे यांनी दिलखुलासपणे उत्तरे दिली. डॉ. दिघे यांनी आभार व्यक्त केले.

प्रा. नागार्जुन वाडेकर
संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा